पशुवैद्यकीय दवाखाना, श्रेणी-२ मौ. राजगाव, ता. जि. वाशिम या संस्थेचे मौ. वारला, ता. जि. वाशिम येथे स्थलांतरण करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग,
शासन निर्णय क्रमांक : संकिर्ण-२०१८/प्र.क्र.१३०/ पदुम-४
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक
मंत्रालय विस्तार, मुंबई-४०००३२.
दिनांक : २८ मे, २०१९.

वाचा : १. कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभागाचे शासन पुरक पत्र क्र.जिवायो-२०१०/प्र.क्र.२९१/पदुम-४ दि.०१.०७.२०११.

२. आयुक्त पशुसंवर्धन, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कार्यालयीन पत्र क्र.व्हीएचडी/२०/ ९९३४-३७/२०१७-१८/ पसं-१२, पुणे, दि.१२.०९.२०१८.

३. पत्र क्र.व्हीएचडी/२०/ ४२८५-८८/२०१७-१९/ पसं-१२, पुणे, दि.१०.०४.२०१९.

प्रस्तावना :-

सन २०१२ च्या पशुगणनेनुसार वाशिम जिल्ह्यातील पशुधन घटक कमी झालेल्या संस्थांचा आढावा घेण्यात आला असता पशुवैद्यकीय दवाखाना श्रेणी-१, राजगाव, ता. जि. वाशिम येथील पशुधन घटक केवळ १,६७५ असल्याचे, तसेच, सदर संस्थेपासून ३ कि.मी. अंतरावर पशुवैद्यकीय दवाखाना, श्रेणी-२ तोंडगाव व ५ कि.मी. अंतरावर पशुवैद्यकीय दवाखाना, श्रेणी-२ उकळीपेन कार्यरत असल्याचे निदर्शनास आलेले आहे.

जिल्हा परिषद, वाशिम सर्वासाधारण सभा दि.१२.०२.२०१६ मधील विषय क्र.१० अन्वये मौ.वारला, ता. जि. वाशिम येथे मौ.राजगाव येथील श्रेणी-२ च्या पशुवैद्यकीय दवाखान्याचे स्थलांतरण करण्याबाबतचा विषय चर्चीला जावून, पशुवैद्यकीय दवाखाना, श्रेणी-२ मौ. राजगाव, ता. जि. वाशिम या संस्थेचे मौ. वारला, ता. जि. वाशिम येथे स्थलांतरण करणेबाबत तसेच, राजगाव येथील कार्यक्षेत्रातील गावे त्यांचे अंतरापासून जवळ असलेल्या तोंडगाव व उकळीपेन या पशुवैद्यकीय संस्थेस जोडण्याबाबतच्या ठरावास जिल्हा परिषद, वाशिम सर्वसाधारण सभेने सर्वानुमते मंजूरी प्रदान केलेली आहे.

त्याअनुषंगाने पशुवैद्यकीय दवाखाना, श्रेणी-२ मौ.राजगाव, ता. जि. वाशिम या संस्थेचे स्थलांतरण मौ.वारला, ता. जि.वाशिम येथे करण्याच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे शासन निर्णय निर्गमित करण्यात येत आहे.

शासन निर्णय :-

पशुवैद्यकीय दवाखाना, श्रेणी-२ मौ. राजगाव, ता. जि. वाशिम या संस्थेचे मौ. वारला, ता. जि. वाशिम येथे स्थलांतरण करण्यास याद्वारे, शासनाची मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जिल्हा परिषद, वाशिम यांनी पशुवैद्यकीय दवाखाना, श्रेणी-२ मौ. राजगाव, ता. जि. वाशिम या संस्थेचे मौ. वारला, ता. जि. वाशिम येथे मंजूर अधिकारी,

कर्मचारी वर्गासह स्थलांतरण करून या ठिकाणी पशुवैद्यकीय दवाखाना कार्यान्वीत करावयाचे आहे. जेणेकरून, या पशुवैद्यकीय दवाखान्याच्या कार्यक्षेत्रातील शेतकरी / पशुपालक यांचेकडील पशुधनास पशुवैद्यकीय सेवा उपलब्ध होतील.

हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आलेला असून, त्याचा संकेतांक क्रमांक २०१९०५२८१०४९०३६००१ असा आहे. सदर शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

VIJAY KARBHARI CHAUDHARI

Digitally signed by VIJAY KARBHARI CHAUDHARI
DN: c=IN, st=Maharashtra, 2.5.4.20=d242787d25852443527f4a3927a849feec29ce26368b8badbee9e69852845f0a, postalCode=400032, street=MANTRALAYA,MUMBAI, serialNumber=e1feea176a1e6a273c574bb6f1a1edb58bf87424118bccd6ee07340581733b70, ou=AGRICULTURE AND ADF, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=VIJAY KARBHARI CHAUDHARI
Date: 2019.05.28 10:56:24 +05'30'

(विजय चौधरी)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत :-

१. आयुक्त पशुसंवर्धन, महाराष्ट्र राज्य, औंध, पुणे- ६७
२. प्रादेशिक सहआयुक्त पशुसंवर्धन, अमरावती विभाग
३. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, वाशिम.
४. जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त, वाशिम.
५. जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जिल्हा परिषद, वाशिम
६. जिल्हा कोषागार अधिकारी, वाशिम
७. निवड नस्ती पदुम ४.